**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८४१/२०२५**
**निशाणी क्रमांकः– १८ खाली**
**उमासिंग व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नावः– संदिप ब्रीजराज सिंग

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्रीमती सिमा चव्हाण यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या वडिलांच्या मृत्यूचा मुळ दाखला मी दाखल केला आहे त्यास **नि.१९** देण्यात येत आहे. माझ्या वडिलांच्या नावाने असलेल्या रेशकार्डची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.२०** देण्यात येत आहे. माझ्या आई व वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा क्र.६७२४/२००२ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.२१** देण्यात येत आहे. माझ्या आजीच्या मृत्यु प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याबाबत मी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. २२** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक रायगड नगरी या पेपरमध्ये दि.२३/०७/२०२५ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.30 17:35:37 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– ३०/०३/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**